महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे | Rs.2/-

रविवार ❖०१ डिसेंबर २०२४ ❖वर्ष ६ ❖अंक १५६ ❖ पाने - ४

RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मध्ये कंपनी, मिळकत, जमीन- जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट, पोटगी, नावात बदल आदी कायदेविषयक छोट्या जाहिरातीना केवळ ५००/- रुपयांत प्रसिद्धी दिली जाईल; कोणत्याही शासकीय नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.

:: कार्यालय ::

९६१९१८८५५८ / ९१५८०७८६०१

E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com
news.thanejeevandeep@gmail.com

## पंतप्रधानांच्या उपस्थितीत होणार शपथविधी




**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता मुंबई(प्रतिनिधी)**

दि.०१: राज्यातील विधानसभा निवडणुकीचा निकाल २३ नोव्हेंबर रोजी जाहीर झाला.

या निकालात भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीला मोठे यश मिळालं. मात्र, महायुतीकडून सत्ता स्थापनेचा दावा करण्यात आला नव्हता. आता ५ तारखेला शपथविधी होणार आहे. मोदींच्या उपस्थितीतीत गुरुवारी शपथविधी सोहळा पण CM पदाचं नाव अजूनही गुलदस्त्यात विधानसभा निवडणुकीचे निकाल लागून आठ दिवस उलटले तरीही सरकार स्थापन झालेले नाही. राज्यात महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले असले तरी मुख्यमंत्री कोण होणार याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही. महाराष्ट्रात सत्ता स्थापनेचा तिढा संपता संपत नाही, अशातच भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंनी महाराष्ट्रातील नव्या सरकारच्या शपथविधीची तारीख निश्चित झाल्याची माहिती दिली. महायुती सरकारचा शपथविधी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत होणार आहे. ५ डिसेंबरला संध्याकाळी ५ वाजता आझाद मैदानवर हा शपथविधी सोहळा संपन्न होणार असल्याची माहिती बावनकुळेंनी एक्स अकाऊंटवर दिली.

या शपथविधी सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि इतर राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसह एनडीएचे महत्त्वाचे नेतेही उपस्थित राहणार आहेत. राज्यातील विधानसभा निवडणुकीत महायुतीने २८८ पैकी २३५ जागा जिंकल्या आहेत. भाजपने सर्वाधिक १३२ जागा जिंकल्या. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने ५७ जागा जिंकल्या, तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने ४१ जागा जिंकल्या. भाजप महायुतीत मोठा पक्ष ठरल्याने मुख्ममंत्रीपद भाजपकडे जाण्याची शक्यता आहे. १५ ते १६ हजार पासची व्यवस्था तसेच प्रत्येक जिल्ह्यातील भाजपचे प्रमुख पदाधिकारी शपथविधी सोहळ्यात सहभागी होणार आहेत. यावेळी आझाद मैदानात ज्यांना सुरक्षेच्या कारणास्तव पास देण्यात आला आहे, त्यांनाच प्रवेश दिला जाईल. महायुतीच्या शपथविधी सोहळ्यासाठी विशेष पासची सुविधा उपलब्ध असणार आहे. सुमारे १५,००० ते १६,००० पासेसची व्यवस्था करण्यात आली आहे.

**मुख्यमंत्रीपदाची शपथ कोण घेणार?**

एकीकडे मुख्यमंत्रीपदासाठी देवेंद्र फडणवीस यांच्या नावाची चर्चा होत असताना आता नवा फॉर्म्युला समोर आला. सुरूवातीचं एक वर्ष मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदेच राहतील, अशी शक्यता वर्तवण्यात आली. या माहितीला भाजपने दुजोरा दिला आहे. एकनाथ शिंदे यांच्या चेहऱ्यावर आणि त्यांच्यात नेतृत्वात निवडणूक लढवली गेली.

मतदारांनी त्यांना कौल दिल्याने एकनाथ शिंदे हे एक वर्ष मुख्यमंत्री राहतील, अशी भाजपमध्ये चर्चा सुरू आहे. जनमताचा अनादर होऊ नये, यासाठी भाजपचे काही ज्येष्ठ नेते ही भूमिका घेत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळं आगामी काळात राज्याच्या मुख्यमंत्रिपदी कोण विराजमान होणार, हेच पाहणं महत्वाचं आहे.

## एकनाथ शिंदेसाठी नवं पद?




**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता मुंबई(प्रतिनिधी)**

दि.०१: विधानसभा निवडणुकांचे निकाल अपेक्षेपेक्षा चांगले येऊनही राज्यात महायुतीचं सरकार अद्याप स्थापन झालेलं नाही. सुरुवातीला मुख्यमंत्री पदावरुन सुरु असलेली रस्सीखेच आता इतर खात्यांपर्यंत आलेली असल्याची सूत्रांची माहिती आहे. भाजपकडून एकनाथ शिंदेंना उपमुख्यमंत्रीपद घेण्याची ऑफर देण्यात आल्याची माहिती आहे. परंतु एकनाथ शिंदेंची त्यासाठी तयारी नाही. शिंदेंचे अत्यंत जवळचे सहकारी उदय सामंत आणि शंभुराज देसाई यांनीही शिंदेंची मनधरणी केली. परंतु त्याचा काही परिणाम झाल्याचं दिसून येत नाही. ऑटोमोबाईल गुन्हा आता एकनाथ शिंदे यांच्यासाठी सरकारमध्ये नवीन पद निर्माण होण्याची शक्यता आहे. समन्वय समितीचं अध्यक्षपद मिळावं, यासाठी एकनाथ शिंदे आग्रही असल्याची माहिती आहे. यासह गृह खात्यावरही शिंदेंची नजर आहेच. मात्र अद्याप भाजपने याबाबत काहीही निर्णय घेतलेला नाही. असे वृत्त आहे.येथे गेले. तेथे ते दोन दिवस मुक्काम करणार असल्याची माहिती आहे. १ तारखेला पुन्हा महायुतीची बैठक बोलावण्यात आलेली आहे. या बैठकीला शिंदे उपस्थित राहतात का, हे पाहाणं महत्त्वाचं आहे. दुसरीकडे शिवसेनेचे प्रवक्ते संजय शिरसाट यांनी एक खळबळजनक विधान केलं आहे. जेव्हा जेव्हा एकनाथ शिंदे त्यांच्या मूळगावी जातात तेव्हा तेव्हा काहीतरी मोठा निर्णय घेतात, असं शिरसाट म्हणाले. त्यामुळे शिंदे नेमका कोणता निर्णय घेणार, हे पाहाणं महत्त्वाचं आहे. एकनाथ शिंदे हे सरकारमध्ये संयोजक अथवा मेंटर होण्यासाठी इच्छूक असल्याची सूत्रांची माहिती आहे. सरकारमध्ये उपमुख्यमंत्रीपद घेऊन इतर नेत्याच्या खाली काम करण्यापेक्षा सरकारवर नियंत्रण ठेवण्याचं काम करण्यासाठी ते इच्छूक आहेत. दुसरीकडे गृहमंत्री, नगरविकास मंत्री ही पदंही मिळावीत, यासाठी शिवसेना आग्रही आहे.

## शिवसेना ठाकरे गट मविआतून बाहेर पडण्याची शक्यता



**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता/मुंबई(प्रतिनिधी)**


दि.०१: राज्याच्या विधानसभा निवडणुकीत भाजप आणि शिंदे गटावर तोफ डागणाऱ्या शिवसेना ठाकरे गटाची राजकीय वर्तुळात तुफान चर्चा रंगलीय. कारण राज्याच्या पोलीस महासंचालर पदावरून रश्मी शुक्ला यांना हटवण्यासाठी काँग्रेससह ठाकरे गटाने महत्त्वाची भूमिका बजावली होती. परंतु, उद्धव ठाकरे यांचे स्वीय्य सहाय्यक आणि आमदार मिलिंद नार्वेकर यांच्या एका ट्रीटमुळं राजकीय वर्तुळात अनेक तर्क-वितर्क लढवले जात आहेत. कारण रश्मी शुक्ला यांची राज्याच्या पोलीस महासंचालकपदी पुन्हा निवड झाल्यावर नार्वेकरांनी एक्सच्या माध्यमातून त्यांचं अभिनंदन केलं आहे. त्यामुळे शिवसेना ठाकरे गट भाजपशी मिळतं जुळतं करतंय का? असा सवाल उपस्थित झाला आहे. महाविकास आघाडीने शुक्ला यांच्या नियुक्तीबाबत आक्षेप घेतला असतानाच दुसरीकडे ठाकरे गटाचे नेते मिलिंद नार्वेकर यांनी शुक्लाचं जाहीरपणे अभिनंदन केलंय. त्यामुळे राजकीय वर्तुळात अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. निवडणुकीच्या काळात काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटाकडून रश्मी शुक्लांबाबत निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करण्यात आली होती.

निवडणूक आयोगाच्या आदेशानंतर सरकारने शुक्ला यांना रजेवर पाठवलं होतं. रश्मी शुक्ला यांना पदावरून हटवण्यात यावे, असे आदेश आयोगाने दिले होते. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, खासदार संजय राऊत, एकनाथ खडसे यांनी शुल्कांवर फोन टॅपिंगचे आरोप केले होते. अशातच नार्वेकर यांनी शुक्ला यांचं अभिनंदन केल्यानं शिवसेना ठाकरे गट महाविकास आघाडीतून बाहेर पडणार, असे संकेत मिळत आहेत. राज्याच्या विधानसभा निवडणुकीची रणसंग्राम सुरु असतानाच निवडणूक आयोगाने रश्मी शुक्ला यांची पोलीस महासंचालकपदावरून बदली केली होत. त्यानंतर या पदावर संजय वर्मा यांना नियुक्त करण्यात आलं होतं. परंतु, आता विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर शुक्ला यांची पुन्हा महासंचालपदी नियुक्ती करण्यात आलीय.

## भाज्या महागल्या

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता/ ठाणे(प्रतिनिधी)**

दि.०१: यंदा परतीचा पाऊस लांबल्यामुळे भाज्यांच्या पिकांचे मोठे नुकसान होऊन त्यांचे उत्पादन घटले होते. पाऊस थांबल्यानंतर पुन्हा भाज्यांच्या पिकाची लागवड करण्यात आली. परंतु सध्या राज्यात सर्वत्र थंडीची लाट पसरली आहे. हे वातावरण भाज्यांच्या वाढीस पूरक नसल्यामुळे भाजी काढणीसाठी तयार होण्यास विलंब होत आहे. त्यामुळे बाजारात काही भाज्यांची आवक घटली असून त्यांच्या



दरात वाढ झाल्याचे चित्र आहे. नवी मुंबई येथील वाशी कृषी उत्पन्न बाजार समितीत पुणे, जुन्नर, नगर, सातारा, बारामती अशा विविध जिल्ह्यांतून भाज्या दाखल होतात. या बाजार समितीतून या भाज्या ठाणे, मुंबई तसेच उपनगरातील किरकोळ बाजारात विक्रीसाठी जातात. नियमित बाजार समितीत अंदाजे ५५० ते ६०० भाज्यांच्या गाड्या दाखल होत असतात. गेले काही दिवसांपासून बाजार समितीत दुधी भोपळा, गवार, कोबी, दोडका, वांगी, शेवगा या भाज्यांची आवक घटल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे त्यांच्या दरात १० ते २० टक्के वाढ झाली आहे. परिणामी, किरकोळ बाजारातही या भाज्यांच्या दरात मोठी वाढ झाली आहे.

पान ४ वर ▶▶

### मतांच्या पुनर्मोजणीसाठी
## दीपेश म्हात्रेंनी भरली रक्कम

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता/ डोंबिवली(प्रतिनिधी)**

दि.०१: - डोंबिवली विधानसभा निवडणुकीतील ठाकरे गटाचे पराभूत उमेदवार दीपेश म्हात्रे यांनी ठाणे जिल्हाधिकाऱ्यांकडे दहा व्हीव्हीपॅट यंत्रातील मते पुन्हा मोजणीसाठी अर्ज केला आहे. या प्रक्रियेसाठी लागणारी चार लाख ७२ हजार रुपयांची रक्कम उमेदवार म्हात्रे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे भरणा केली आहे. त्याचबरोबर उद्धव



बाळासाहेब ठाकरे पक्षाने डोंबिवलीत ईव्हीएम विरुद्ध आंदोलन सुरू केले असून त्या आंदोलनाचा भाग म्हणून शहरात स्वाक्षरी मोहीम राबविण्यात येत आहे.शहरातील सामान्य नागरिकांनी पान ४ वर ▶▶

## ठाण्यातील हवेची गुणवत्ता खराब असल्याचा दावा

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता/ ठाणे(प्रतिनिधी)**

दि.०१: ठाणे जिल्ह्याची हवेची गुणवत्ता केंद्रीय प्रदूषण नियंत्रण विभागाच्या अहवालानुसार मध्यम पातळीवर नोंदविण्यात आली. जिल्ह्यातील ठाणे शहरात सरासरी १४०, नवी मुंबई येथे १४०, बदलापूर येथे १६० हून अधिक निर्देशांक नोंदविण्यात आला. हवेची गुणवत्ता मध्यम असली तरी या गुणवत्तेमुळे हृदयरोग, श्वसनाचा त्रास, फुफ्फुसासंदर्भातील आजार असलेल्या नागरिकांना श्वास घेण्यासाठी त्रास होऊ शकतो. सरकारी अहवालानुसार जिल्ह्याची हवेची गुणवत्ता मध्यम असली तर एक्यूआय डॉट इन या संकेतस्थळानुसार ठाणे जिल्ह्यातील हवेच्या गुणवत्ता वाईट पातळीवर नोंदविण्यात आली आहे.

देशात काही दिवसांपासून अनेक ठिकाणी हवेची गुणवत्ता वाईट होऊन प्रदूषण वाढले आहे. ठाणे जिल्ह्यातही हवेची गुणवत्ता वाईट पातळीवर असल्याची नोंद एक्यूआय डॉट इन या संकेतस्थळावरील आकडेवारीतून समोर आले आहे. हिवाळयामध्ये हवेतील गारव्यामुळे धुलीकण तळामधील भागात तरंगत असतात. त्यामुळे हवेची गुणवत्ता खराब होऊन प्रदूषण होत असते.

एक्यूआय डॉट इनच्या निर्देशांकानुसार, ठाणे जिल्ह्यातील हवेची गुणवत्ता मागील आठवड्याभरापासून वाईट स्थितीत आहे. ठाणे शहरातील हवेची गुणवत्ता सरसरी ११२ ते ११८, भिवंडी शहरातील हवेची गुणवत्ता ही १०५ ते ११६ आणि कल्याण शहराची १०७ ते ११८ इतक्या सरासरी प्रमाणात आहे. तसेच नवी मुंबईतील ऐरोली शहराची गुणवत्ता ११० ते १२० इतक्या प्रमाणात आहे. हवेची गुणवत्ता सकाळच्या वेळेत अधिक वाईट असते. त्यामुळे सकाळी कामानिमित्ताने बाहेर पडणारे पान ४ वर ▶




## 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे निकष बदलणार नाही'

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता/ मुंबई(प्रतिनिधी)**

दि.०१:लाडकी बहीण योजनाः सरकारने दिला मोठा दिलासा, लाडक्या बहिणींच्या मनातील संभ्रम दूर! महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या विजयाच्या मागे 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना'चे महत्वाचे योगदान आहे. जुलै २०२४ पासून सुरु करण्यात आलेल्या या योजनेअंतर्गत महिलांना दरमहा १,५०० रुपये दिले जात होते. आता, महायुतीने निवडणुकीपूर्वीच योजनेची रक्कम वाढवून २,१०० रुपये केली आहे. यामुळे लाडक्या बहिणींच्या आशावादाला बळ मिळाले आहे. तथापि,



निवडणुकांच्या निकालानंतर योजनेच्या निकषांमध्ये बदल होण्याची चर्चा सुरू होती, ज्यामुळे महिलांमध्ये संभ्रम निर्माण झाला. सौंदाळा गावात शिव्या देणाऱ्यांना मिळणार एक धक्कादायक शिक्षा! काय आहे या निर्णयामागील कारण? यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीच उत्तर दिलं आहे. पुण्यात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव यांची भेट घेतल्यानंतर पत्रकारांशी बोलताना पवार यांनी स्पष्ट केले की, 'आता कोणतेही निकष बदलणार नाहीत.' यावर अजित पवार यांचा ठाम विश्वास

### अजित पवारांचे वक्तव्य !

आहे की, 'काळजीवाहू सरकारमध्ये काही बदल होणार नाहीत' आणि योजनेतील महिला लाभार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. बोर्ड परीक्षेत उच्च गुण मिळवायचे असतील तर या ९ टिप्स एकदा वापरून पहा. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या अटींमध्ये एक प्रमुख अट अशी होती की, कुटुंबाचं वार्षिक उत्पन्न अडीच लाखांपर्यंत असावं. मात्र, निकालानंतर अर्जाची फेरतपासणी होईल, अशी चर्चा होती. राज्यावरील कर्जाच्या पान ४ वर ▶▶

# भिवंडीत भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण केंद्र सुरु

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेतर्फे इदगाह स्लॉटर हाऊस जवळ भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण केंन्द्र नुकतेच सुरू करण्यात आले असून सदर उपक्रम यशस्वी करण्याच्या दृष्टीने मा. आयुक्त तथा प्रशासक श्री . अजय वैद्य सर यांनी आज दि.२९.११.२०२४ रोजी भिवंडी शहरात कार्यरत प्राणी प्रेमी संघटनांच्या पदाधिकारी व प्रतिनिधी यांची बैठक घेऊन महानगरपालिका प्रशासनातर्फे राबवित असलेल्या उपक्रमांची माहिती दिली तसेच पेटा अधिनियम,सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचना, शासन निर्देश यांचे पालन करण्याच्या दृष्टीने प्राणीप्रेमी सामाजिक संघटनांचे अनुभव व सुचना जाणून घेऊन त्यानुसार संबंधीत अधिकारी यांना आवश्यक निर्देश दिले. यावेळी उपायुक्त (मुख्यालय) श्री. रोहिदास कुरदुळकर,उपायुक्त (आरोग्य) श्री शैलेश दोन्दे, सहायक आयुक्त (आरोग्य) श्री. नितीन पाटील , आरोग्य अधिकारी श्री.जयवंत सोनावणे व अन्य अधिकारी उपस्थित होते.

## मुरबाड वरिष्ठ पोलीस निरीक्षक
# मनोज कामत यांचा मतिमंद मुलांसोबत वाढदिवस साजरा




**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**मुरबाड(बाळासाहेब भालेराव):**
दि.०१: जगी ज्यास कोणी नाही, त्यास देव आहे,, निराकार आभाळाचा तोच भार वाहे,,या संत उक्तीप्रमाणे, निराधारांना प्रेम, माया लावणारे, त्यांच्या सोबत काही क्षण का होईना, परंतु मनापासून रमणा-या व्यक्ती दुर्मिळच, मात्र याला अपवाद ठरले आहेत.ते एक पोलीस अधिकारी,,ते म्हणजे मुरबाड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोज कामत त्यांचा वाढदिवस होता.या वाढदिवसा ला कुठला ही थाटमाट, गाजावाजा न करता त्यांनी आपल्या परिवाराला सोबत घेऊन चक्क शिरवली, व कान्होळ येथील मतिमंद मुलांच्या शाळेत जाऊन, त्यांना गोड खाऊ व शैक्षणिक साहित्याचे वाटप करुन आपल्या जिवनातील काही क्षण व्यतीत करत आपला वाढदिवस अतीशय साधेपणाने साजरा केला.मुरबाड हि संतांची,विरपुरुषांची भुमी आहे.जे बाबासाहेब आंबेडकरांचे आजोळ,विर हुतात्मा भाई कोतवाल, हुतात्मा विर हिराजी गोमाजी पाटील यांच्या पराक्रमाने पावन झालेली भुमी, जिथे कामत सारखे अधिकारी केवळ अधिकारा सारखे न वागता, माणसांना माणसाप्रमाणे वागवतात. आणि रंजल्या गांजलेल्याना आपले माणणारे मनोज कामत ,,एक माणसातले देवमाणूस म्हटले तर चुकीचे ठरणार नाहीत.



**शिर्डीहून कल्याणला आलेली श्रीसाईबाबांची पदयात्रा पालखी आमदार सौ. सुलभाताई गणपत शेठ गायकवाड यांच्या कार्यालयाच्या प्रांगणात आली तेव्हा नवनिर्वाचित आमदार सौ.सुलभाताई गणपत श्री गायकवाड आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी पालखीचे दर्शन घेतले आणि आमदार सौ सुलभाताई गणपत शेठ गायकवाड यांनी पालखी घेताना घेतलेले छायाचित्र.**

# पेणमध्ये ढोल ताशांच्या गजरात साई बाबांची मिरवणुक

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता**
**पेण(प्रतिनिधी)**
दि.०१: पेण तालुक्यासह रायगड जिल्ह्यात श्री साई बाबांची मानाची पालखी म्हणून समजल्या जाणाऱ्या ओम साई पदयात्रा मित्र मंडळाच्या भव्यदिव्य मिरवणुकीने संपूर्ण पेण शहर साईमय वातावरणात न्हाऊन गेले. पेण साई मंदिर कासार तलाव येथून सायंकाळी सहा वाजता विद्युत रोषणाई, ढोल ताशांच्या गजरात व वरळी बिट्स ब्रॉसबँड पथकाच्या सुंदर संगीताच्या तालावर मिरवणुकीस सुरुवात झाली. या मिरवणूक सोहळयामध्ये तीन चल चित्र रथ शामिल झाले होते. यामध्ये द्वारकामाई मंदिर, बैलगाडी हाकताना साईबाबा, हुबेहुब दिसणारे साईबाबा यांचा विशेष समावेश होता. साई बाबांच्या मिरवणुकीची संपूर्ण पेण शहरात परिक्रमाकरण्यात आली.

श्री साई बाबांच्या पालखी मिरवणुकीची सुरुवात प्रांताधिकारी प्रवीण पवार, तहसीलदार तानाजी शेजाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन टोम्पे, पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल, वडखळ पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे, दादर सागरी प्रभारी अधिकारी नागेश कदम, अपघातग्रस्तांचे मदतगार कल्पेश ठाकूर यांच्या हस्ते व हजारो महिलांच्या उपस्थितीत साई बाबांची महाआरती घेऊन करण्यात आली.

पेण साई मंदिरा पासून फटाक्यांच्या आतषबाजीत सुरू झालेली मिरवणूक तेरा घरांची आळी, चावडी नाका, आंबेडकर चौक, नगरपालिका चौक, राजू पोटे मार्ग, कोळीवाडा, बाजार पेठ, छत्रपती शिवाजी महाराज चौक, कासार आळी, हनुमान आळी आणि पुन्हा साई मंदिर येथे वाजत गाजत आली. पालखी मार्गावर सर्वत्र भगवे पताके, भगवे झेंडे लावण्यात आले होते. हजारोंच्या संख्येने महिला वर्ग व पेणकर या पालखी मिरवणुक सोहळयामध्ये सामील झाले होते.काल सायंकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यत पालखी मिरवणूक पेण शहरात फिरल्या नंतर श्री साई बाबांच्या महाआरतीने व महाप्रसादाने मिरवणुकीची सांगता करण्यात आली.

त्यानंतर शुक्रवारी सकाळी ६ वाजता साई बाबांची पालखी पायी चालत शिर्डीकडे मार्गस्थ झाली.

गेली १६ वर्ष ओम साई पदयात्रा मित्र मंडळ पेण ते शिर्डी पर्यंत साई पालखीची सेवा करत आहेत. पेण येथून निघालेली ही बाबांची पालखी सोमवार दि.६ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता शिर्डीत पोहोचणार आहे. तसेच सोमवार ९ डिसेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता सेंच्युरीयन पार्क चिंचपाडा पेण येथे साईंचा भंडारा होणार आहे.सदर मिरवणूक पालखी सोहळा यशस्वी करण्यासाठी ओम साई पदयात्रा मित्र मंडळाचे सर्वेसर्वा कल्पेश ठाकूर, मितेश भानुशाली व त्यांचे २०० सभासद गेली महिनाभर दिवस रात्र मेहनत घेत होते. पेणकर वर्षभर या श्री साई बाबांच्या भव्यदिव्य मिरवणुकीची वाट पाहत असतात.

# भारतीय जीवन पद्धतीची तत्वप्रणाली म्हणजे भारतीय संविधान – सुधाकर सरवदे

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/**
**अंबरनाथ(प्रतिनिधी) :**
दि.०१: युद्ध आणि शांती काळात भारतीयांना एकसंघ ठेवण्याचे सामर्थ्य असणारा सर्व भारतीयांचा शुध्द धर्मग्रंथ भारतीय संविधान आहे. प्रत्येक भारतीयांने जीवन कसे जगावे हे दर्शवणारी तत्वप्रणाली म्हणजेच भारतीय संविधान असे गौरवोद्गार जेष्ठ व्याख्याते सुधाकर सरवदे यांनी काढले. शिवराय फुले शाहू आंबेडकर सामाजिक संघटना आणि सार्वजनिक बुद्ध जयंती महोत्सव मंडळ अंबरनाथ यांच्या वतीने आयोजित २६ नाव्हेंबर,भारतीय संविधान गौरव दिनाच्या अमृतमहोत्सवी वर्षी आयोजित उत्साहात ते आपले विचार व्यक्त करत होते.आपल्या संविधानाने तळागळातील समाजा सह देशातील १०० टक्के भारतीयांच्या अधिकाराला अबाधित ठेवले आहे.



या कार्यक्रमाच्या सुरुवातीला तथागत बुद्ध , छत्रपती शिवराय, म.फुले, सावित्रीमाई, छत्रपती शाहू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते व उद्योगपती हिरामण (आबा) भवार , किणीकर प्रतिष्ठान पुतणे गणेश किणीकर, भिमा कोरेगाव मुक्ती आंदोलनाचे दादाभाऊ अभंग, माजी नगरसेवक एड. संदिप भराडे, आण्णाभाऊ साठे आधार प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रकाश जाधव, जेष्ठ मार्गदर्शक सुधाकर बर्वे , लताताई डोंगरे आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया (सेक्यु) किशोर गरुड यांना सम्मानीत करण्यात आले.

या प्रसंगी लोकशाहीर विठ्ठल उमप थिएटर प्रस्तुत ' वामन नव्या दमाने ' या सांस्कृतिक कार्यक्रमात शाहीर संदेश उमप आणि सुप्रसिद्ध गायक प्रविण ढोणे यांनी महाकवी वामन दादा कर्डक यांच्या अजरामर गीतांची मेजवानीचा उपस्थित श्रोत्यांनी अस्वाद घेतला. पहा पहा मंजुळा, भिमा तुझ्या मताचे जर पाच लोक असते,बंधू रं शिपाया तू देरं दे रुपाया, मला चिड येत नाही हाच माझा गुन्हा यासारख्या अनेक प्रबोधन गितांवर ठेका धरत सगळयांना विचार करण्यास भाग पाडले.शाहीर विठ्ठल उमप यांचा २६ नोव्हेबर हा स्मृतीदिवस,त्यांना तसेच २६/११ मुंबई शहरावर झालेला अतिरेकी हल्ल्यातील शहीदांनाही यावेळी श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्र संचालन पत्रकार प्रा. प्रफुल केदारे यांनी केले.तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्था अध्यक्ष धनंजय सुर्वे यांनी केले व आभार भरत टपाल यांनी मानले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संतोष पगारे, किरण कांबळे, भास्कर बोराळे, राजेश खिल्लारे, चंद्रकांत मोरे, अजय जाधव (अध्यक्ष-उल्हासनगर) सुभाष कांबळे (उल्हासनगर), बापुराव मेश्राम, अनिल गजभिये, विशाल मागाडे, संजय बन्सल, भरत डावरे, भाऊसाहेब बच्छाव, रेश्मा सुर्वे, अंजली कोटाळकर, प्रशांत गिरबीडे, स्वप्निल क्षेत्रे, प्रथमेश कांबळे, अडव्होकेट मंगेश टपाल, इंद्रपाल कांबळे, मधुकर रामटेके, महेश जाधव, तानाजी सोणावने, राजेश बनसोडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# केडीएमसीचा मालमत्ता कर थकविणे पडले महागात

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता**
**डोंबिवली(प्रतिनिधी)**
दि.०१:कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने मालमत्ता कर भरण्यासंदर्भात सूट दिल्या आहेत. एकीकडे वेळेत कर भरणा केल्यास सवलतींचा लाभ करदात्यांना निश्चितच होऊ शकतो. तथापी दुसरीकडे कर भरणा करण्यास टाळाटाळ करणाऱ्यांवर मात्र केडीएमसीने कठोर कारवाईचा बडगा उगारला आहे. डोंबिवलीतील ८/ग प्रभाग क्षेत्र कार्यालयांतर्गत येणाऱ्या गोविंद पाटील यांच्या ५ दुकान गाळयांसह क्रिटीकल केअर सेंटर ला थकबाकीमुळे सील करण्याची कारवाई करण्यात आली.



१७ लाख ५३ हजार ९७७ इतकी एकूण थकबाकी आहे. डोंबिवली पूर्वेकडील ८/ग प्रभाग क्षेत्रात असलेल्या बिगर निवासी मालमत्तांना वारंवार नोटीसा बजावण्यात आल्या होत्या. तथापि प्रतिसाद न देता दुर्लक्ष करून मालमत्ता कराचा भरणा करत नसल्याचे पाहून महापालिका आयुक्त डॉ. इंदूराणी जाखड यांनी कठोर कारवाईचा बडगा उगारण्याचे निर्देश दिले. कर निर्धारण व संकलन विभागाच्या उपायुक्त स्वाती देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवारी ८/ग प्रभागाचे सहाय्यक आयुक्त संजयकुमार कुमावत आणि अधिक्षक ज्ञानेश्वर कंखरे यांच्या पथकाने थकबाकी पोटी असलेल्या मालमत्ता सील करण्याची धडक कारवाई केली. या कारवाईत डोंबिवली पूर्वेकडील नांदिवली रोडला असलेले गोविंद पाटील यांचे ११ लाख ३७ हजार २३४ रूपये इतक्या थकबाकीपोटी एकूण ५ दुकानी गाळे सिल करण्यात आले, तसेच मानपाडा रोडला असलेल्या लक्ष्मी निवासमधील क्रिटीकल केअर सेंटरवर ७ लाख १६ हजार ७४३ इतक्या थकबाकी पोटी सिल करण्याची कारवाई करण्यात आली.

# दुसऱ्या पत्नीला प्रॉपर्टीत अधिकार मिळतो ?

आपल्या देशातील न्यायालयांमध्ये सर्वाधिक खटले हे संपत्तीच्या वादाचे आहेत. मालमत्तेचे विभाजन हा नेहमीच अनेक कुटुंबांमध्ये, विशेषतः भावांमधील वादाचा प्रमुख मुद्दा राहिला आहे. पुत्रांसह मुलीही वडिलांच्या मालमत्तेवर हक्क सांगू शकतात. अलीकडच्या काळात लिव्ह इन रिलेशनशिप किंवा दुसऱ्या पत्नीने पतीच्या प्रॉपर्टीत हिस्सा मागितल्याची अनेक प्रकरणे समोर आली आहेत. पतीच्या मालमत्तेमध्ये दुसऱ्या पत्नीचे हक्क प्रामुख्याने २ कारणांच्या आधारे निश्चित केले जातात. यातील पहिली म्हणजे विवाहाची कायदेशीर वैधता आणि धार्मिक आधारांवर लागू होणारे नियम आणि कायदे. दुसरी पत्नी कधी मागू शकते हिस्सा ? कायद्यानुसार, जर संबंधित विवाह वैध ठरत असेल तर दुसरी पत्नी पतीच्या मालमत्तेवर हक्क मागू शकते. हिंदू विवाह कायदा, १९५५ नुसार, दोघांपैकी कोणाचाही जोडीदार हयात नसेल किंवा त्यांच्यात घटस्फोट झाला असेल तरच दुसऱ्या विवाहाला कायदेशीर दर्जा मिळतो. या दोनपैकी एक अटी पूर्ण झाल्यास दुसरा विवाह वैध ठरतो. भारतातील वारसा कायदा, कायदेशीररित्या वैध विवाह झाल्यास, दुसऱ्या पत्नीला पहिल्या पत्नीच्या बरोबरीने वागणूक देतो. मालमत्तेत देखील समान वाटा घेण्याचा अधिकार तिला आहे. विवाह वैध नसला तरीही हा अधिकार मिळतो जर पतीचा दुसरा विवाह कायदेशीररीत्या वैध नसेल, तर दुसरी पत्नी पतीच्या वडिलोपार्जित मालमत्तेवर कोणताही दावा करू शकणार नाही. मात्र, पतीच्या स्व-अधिग्रहित मालमत्तेच्या बाबतीत ही अट लागू होणार नाही. पती मृत्यूपत्राद्वारे त्याच्या दुसऱ्या पत्नीसह कोणाल ही संपत्ती देऊ शकतो. जर मृत्यूपत्र न सोडता पतीचा मृत्यू झाला तर त्याची मालमत्ता त्याच्या कायदेशीर वारसांमध्ये विभागली जाईल. उत्तराधिकार कायद्यानुसार त्याच्या सर्व वारसांमध्ये त्याच्या मालमत्तेचे समान वाटप होईल.

# पेण पोलिसांकडुन घरफोडी करणा-या सराईत चोरास अटक

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता**
**पेण(प्रतिनिधी)**
दि.०१: पेण पोलीस ठाणे हद्दित दिवसाच्या घरफोडी, चोरीचा गुन्हा दाखल असुन पोलीस अधिक्षक रायगड सोमनाथ घार्गे अप्पर पोलीस अधिक्षक अभिजित शिवथरे यांनी सदरचा गुन्हा उघडकिस आणणबबाबत सुचना दिल्या होत्या.

२६/११/२०२४ रोजी १२.३० ते १५.३० वा. चे दरम्यान यांतील फिर्यादी शश जगन्नाथ कृष्णा ठाकुर वय ५७ वर्षे रा. ठाकुर कॉम्प्लेक्स, चिंचपाडा रोड, सरकारी हॉस्पीटलच्या मागे पेण ता. पेण जि. रायगड यांनी राहत्या बिल्डींग मध्ये दर्शनी भागी सरस्वतीची मुर्ती गेले २० वर्षापुर्वी स्थापन केली होती. सदर मुर्ती ही तळमजल्यावर असुन फिर्यादी हे पहिल्या मजल्यावर असल्याने त्यादरम्यान अनोळखी आरोपीत याने घराचे तळमजल्यावरील ग्रिलचा दरवाजा उघडा असल्याचा फायदा घेवुन त्यावाटे



आत प्रवेश करून ९५,०००/- रू. किंमतीची पंच धातुची सरस्वतीची मुर्ती त्यावर १ किलो २५० ग्रॅम वजनाचा चांदीचा मुलामा दिलेला अंदाजे १५ ते १८ किलो वजनाची मुर्ती चोरी केलेबाबत पेण पोलीस ठाणे गुन्हा रजि. ३११/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. मा. पोलीस निरीक्षक संदिप बागुल यांचे आदेशाने सदर गुन्हयाचा तपास पोह/१०४१ राजेंद्र रामचंद्र भोनकर यांचेकडे देण्यात आलेला असुन सदर गुन्हयाचा तपास उप विभागीय पोलीस अधिकारी गजानन टोम्पे यांच्या मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक संदिप बागुल पेण पोलीस ठाणे यांच्या सुचनांनुसार गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे अधिकारी व अमंलदार हे करित होते.

पेण पोलीस ठाणेकडील गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे अधिकारी व अमंलदार सदर गुन्हयाचा तपास रोडवरिल सी. सी.टि.व्ही. फुटेज व गोपनिय माहीतीच्या आधारे कसोशिने तपास करून गुन्हा उघडकिस आणण्यास यश आले आहे. सदर गुन्हयात आरोपीत तरूण विलास चव्हाण वय २० वर्षे रा. आय. टी. आय. कॉलेज जवळची झोपडपट्टी पेण ता. पेण जि. रायगड यास अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयातील आरोपीत याने तपासादरम्यान गुन्हा केल्याची कबुली दिली असुन त्याच्या ताब्यातुन घरफोडी, चोरी केलेली सरस्वतीची मुर्ती ९५,०००/- रू. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. सदर आरोपीत हा सराईत गुन्हेगार असुन आरोपीत विरूध्द यापुर्वी खालीलप्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

पोलीस ठाणे पेण पोलीस ठाणे गु. रजि. नं. ७०/२०२२ पेण पोलीस ठाणे गु. रजि. नं. २४१/२०२२ पेण पोलीस ठाणे गु. रजि. नं. ९२/२०२३ पेण पोलीस ठाणे गु. रजि. नं. १११/२०२४ पनवेल पोलीस ठाणे गु. रजि. नं. २२६/२०२०,पनवेल पोलीस ठाणे गु. रजि. नं. ३३३/२०२३अधिनियम भा.द.वि,कलम ३२४,३२३,५०४,३४,३९२,भा.द.वि. ४५७,३८०,३७९ सदर गुन्हयाचा तपास गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे पोसई श्री. समद बेग, सहा. फौजदार श्री. राजेश पाटील, पोह/१०४१ राजेंद्र भोनकर, पोह/८७३ संतोष जाधव, पोह/८६१ प्रकाश कोकरे, पोह/१५६८ अजिंक्य म्हात्रे, पोह/१४२४ सुशांत भोईर, पोह/८८५ सचिन व्हसकोटी, पोह/११४८ पाटील, पोना/२३१९ अमोल म्हात्रे, पोशि/१९५१ गोविंद तलवारे, पोशि/१२४१ शिंगाडे यांनी केलेला आहे.

## नेतिवली टेकडी परिसरात
# आगीत घर जळून खाक

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता**
**कल्याण(प्रतिनिधी)**
दि.०१: कल्याण पूर्वेतील नेतवली टेकडी परिसरात एका बंद घराला आग लागल्याने या आगीत घर जळून खाक झाल्याची घटना घडली. सुदैवाने जिवित हानी टळली.

कल्याण पूर्वेतील नेतवली टेकडी परिसरात भंगार वेचक महिलेच्या बंद घराला आग लागल्याची घटना शनिवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास घडली. या आगीत घर जळून खाक झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी पोहचत आग विझवली. या घरा ला नेमकी आग कशामुळे लागली हे कारण समजू शकले नाही. घराला लागेल्या आगीमुळे घर जळून खाक



झाल्याने या घरात राहणाऱ्या महिलेवर ऐन कडक्याच्या थंडीत बेघर होण्याची वेळ आली आहे.

त्या परिसरात राहणारे रितेश बारसे यांनी सांगितले की,दुपारच्या अडीच च्या सुमारास महिलेच्या बंद असलेल्या घराला आग लागली शेजारील, युवकांनी अग्निशमन दलाच्या जवान पोहचे पर्यंत आग विझविण्याचे प्रयत्न केले.अग्निशमन दलाच्या जवानांनी येऊन पूर्णतः आग विझवली बधित बंद असलेल्या घरात कचरावेचक महिला राहत होती.

**दैनिक राशिफल**

**०१ डिसेंबर २०२४ रविवार**

**मेष**
कौटुंबिक आणि आर्थिक बाबतीत घेतलेले महत्त्वाचे निर्णय सकारात्मक होतील.तुम्ही तुमच्या मोठ्या भावाशी मालमत्तेशी निगडीत काही गोष्टी बोलाल.

**वृषभ**
दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. कोणत्याही नकारात्मक परिस्थितीत नर्व्हस होण्याऐवजी त्यावर उपाय शोधलात तर तुम्हाला उपाय सापडेल.

**मिथुन**
मेहनतीने योजनेला गती मिळेल. दिवस तुमच्यासाठी अनुकूल असणार आहे. काम करण्यापूर्वी त्यासंबंधीची योग्य माहिती मिळवून त्यावर काम करू.

**कर्क**
वित्ताशी संबंधित काही योजना बनवाल. तुमची कामाची आवड तुम्हाला कठोर परिश्रम करण्याची क्षमता देईल. प्रवास करण्यासाठी दिवस अनुकूल आहे.

**सिंह**
वाहन किंवा कोणत्याही महागड्या उपकरणाचे नुकसान झाल्यास मोठा खर्च होईल. आज तुमच्या दिनचर्येत काही बदल केल्यास नवीन संधी मिळतील.

**कन्या**
तुम्हाला चांगले परिणाम मिळतील. उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण होतील. वडीलधाऱ्यांचे प्रेम आणि आशीर्वाद या मुळे घरात शांततापूर्ण वातावरण राहील.

**तूळ**
कुटुंबातील सदस्यांमध्ये प्रेम आणि सौहार्दाची भावना असेल. दिवस सुवर्ण दिवस असणार आहे.खोलवर विचार करून तुमचे नाते सुधाराल.

**वृश्चिक**
दुपारनंतर तुम्हाला तुमच्या भविष्याशी संबंधित काही चांगली बातमी देखील मिळेल.आजचा दिवस तुमच्यासाठी नवीन उत्साहाने भरलेला असणार आहे.

**धनु**
दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे. अनेक वैयक्तिक कामांमध्ये दिवस जाईल. स्वतःवर विश्वास ठेवा. क्षमतेपेक्षा जास्त कामाचा ताण घेऊ नका.

**मकर**
जबाबदाऱ्या असतील, त्यापासून दूर पळण्याऐवजी तुम्ही त्या चांगल्या पद्धतीने पूर्ण करण्याचा प्रयत्न कराल. निर्णय घाईत घेऊ नका.

**कुंभ**
आर्थिक स्थिती मजबूत राहील, वस्तू खरेदी करण्यासाठी बाजारात जाऊ शकता. नवीन तंत्रज्ञान वापरण्याशी संबंधित कार्यपद्धतीवर चर्चा होईल.

**मीन**
तुम्ही मालमत्ता किंवा वाहन खरेदी करण्याचा विचार करत असाल त्याची अंमलबजावणी करण्यासाठी ही अनुकूल वेळ आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
**जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली**
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
**प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!**
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) — कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) — कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) — कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) — कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११२२४) — कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# द किंग इज बॅक...

रात्री नंतर सकाळ होतेच.... अंधारातून मार्ग काढला की प्रकाश दिसतोच मात्र हीच सकाळ आणि प्रकाश पाहण्यासाठी आपल्याकडे हवा तो संयम आणि स्वतःच्या क्षमतेवर असलेला विश्वास. जर स्वतःच्या क्षमतेवर विश्वास असेल आणि कितीही कठीण काळ आला तरी संयम सोडला नाही तर अपयशाची साखळी तोडून माणूस यशाची शिखरे गाठतोच. याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे भारताचा माजी कर्णधार आणि धडाकेबाज फलंदाज विराट कोहली.


गेली दीड वर्ष विराट कोहली हा अपयशाच्या गर्तेत सापडला होता. धावांची रास उभारणारी विराट कोहलीची बाब त्याच्यावर रुसली होती. शतकाचे इमले उभारणाऱ्या विराटला मागील दीड वर्षात कसोटीत एकही शतक झळकावता आले नाही त्यामुळे त्याच्यावर टीका होऊ लागली. काही महाभागांनी तर त्याला संघाच्या बाहेर ठेवण्याची मागणी केली. स्वतःला क्रिकेटचे तज्ज्ञ म्हणवून घेणारे देखील विराटवर टीका करू लागले. मीडियात देखील विराटवर हल्ला होऊ लागला.

विराटचा हरवलेला फॉर्म भारतासाठी चिंतेचा विषय ठरला होता. विराट मात्र टिकाकरांकडे दुर्लक्ष करून आपल्या फलंदाजीवर लक्ष केंद्रित करत होता. टिकाकारांच्या टीकेला उत्तर देण्यात त्याने वेळ घालवला नाही तो नेहमी म्हणत असत की मला फक्त एका मोठ्या खेळीची गरज आहे. ती जर आली की मी पुन्हा फॉर्मात येईल कारण त्याचा स्वतःचा क्षमतेवर विश्वास होता. त्याला हवी असलेली मोठी खेळी ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या पर्थ मधील पहिल्या कसोटीत आली.

पर्थ कसोटीतील दुसऱ्या डावात विराटने धडाकेबाज नाबाद शतक झळकावले आणि भारताला जुना विराट सापडला. विराट पुन्हा फॉर्मात आला. द किंग इज बॅक.... असाच इशारा त्याने या खेळीने जगाला दिला. टी २० विश्वचषकातही त्याला म्हणावा तसा फॉर्म सापडला नव्हता मात्र दक्षिण आफ्रिके विरुद्ध महत्वाच्या अंतिम सामन्यात त्याने अविश्वसनीय अर्धशतकी खेळी करून भारताला विश्वविजय मिळवून दिला मात्र पुन्हा त्याचा फॉर्म हरपला नुकत्याच झालेल्या बांगलादेश व न्युझीलंड विरुद्धच्या कसोटी सामन्यांच्या मालिकेत त्याला धावा काढता आल्या नाहीत मात्र ऑस्ट्रेलिया विरुद्ध त्याने आपल्या शतकी तडाखेबंद खेळीने भारताला एकहाती विजय मिळवून देताना अनेक विक्रमांना गवसणी घातली.

या शतका बरोबरच त्याने अनेक विक्रमांना गवसणी घातली. हे त्याचे कसोटीतील ३० वे शतक आहे. हे त्याचे ऑस्ट्रेलियातील सातवे शतक आहे. ऑस्ट्रेलियात सर्वाधिक कसोटी शतक झळकावणारा भारतीय असा विक्रम आता त्याच्या नावावर जमा झाला आहे. पूर्वी हा विक्रम सचिन तेंडुलकर च्या नावे होता त्याने ऑस्ट्रेलियात सहा कसोटी शतके झळकावली आहेत. विराट कोहलीच्या नावावर आता एकूण ८१ शतक आहेत. कसोटीत ३०, एकदिवसीय सामन्यात ५० तसेच टी २० सामन्यात १ असे एकूण ८१ शतके त्याच्या नावावर जमा झाली आहेत. ८० पेक्षा अधिक शतके झळकावण्याचा पराक्रम करणारा सचिन नंतरचा तो दुसराच खेळाडू आहे. सध्या खेळत असणारा कोणताही खेळाडू त्याच्या आसपासही नाही. सध्याची कामगिरी पाहता तो लवकरच विक्रमविर सचिन तेंडुलकर यांचा १०० शतकांचा विक्रम लवकरच मोडेल यात शंका नाही. मागील दीड वर्षाचे अपयश मागे टाकून तो पुन्हा आपल्या जुन्या अवतारात परतला आहे हे भारतासाठी शुभचिन्ह आहे. विराट पुन्हा फॉर्मात आल्याने या वर्षी तो धावांचा रतीब घालणार यात शंका नाही. यावर्षी भारत अनेक मोठ्या स्पर्धेत सहभागी होणार आहे. या मोठ्या स्पर्धेत विराटचा फॉर्म भारताला विजय मिळवून देईन. यावर्षी एकदिवसीय सामन्यांची चॅम्पियन ट्रॉफी तसेच विश्व कसोटी अजिंक्यपद (wtc) देखील आहे. जर विराटचा हा फॉर्म असाच राहिला आणि त्याला संघातील इतर खेळाडूंनी साथ दिली तर यावेळी भारत या दोन्ही महत्वाच्या स्पर्धेत अजिंक्यपद मिळवेल यात शंका नाही. विराट अजूनही तरुण आहे त्याचा फॉर्म परत आला आहे आणि त्याच्या फिटनेसवर तर शंकाच नाही संघातील सर्वाधिक फिट खेळाडू हा विराटच आहे त्यामुळे तो आणखी तीन चार वर्ष सहज खेळू शकतो या दरम्यान तो सचिनचा १०० शतकांचा विक्रम सहज मोडू शकतो. सचिनचा विक्रम जर कोणी मोडू शकेल तर तो फक्त विराटच आहे कारण आज त्याच्या नावे ८१ शतकांची नोंद आहे. सध्या खेळणारा कोणताही खेळाडू त्याच्या आसपासही नाही. त्यामुळे सचिनचा विराट विक्रम विराट कोहलीच मोडेल यात शंका नाही.

**- श्याम ठाणेदार,दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**



# भाई कोतवाल जयंती

**(१ डिसेंबर १९१२ - २ जानेवारी १९४३)**





**डॉ. आनंदराव सूर्यवंशी**

आज भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील झुंजार क्रांतिवीर हुतात्मा विठ्ठल लक्ष्मण कोतवाल उर्फ भाई कोतवाल यांचा जन्मदिवस आहे. त्यांचा जन्म। डिसेंबर १९१२ रोजी माथेरान येथे कष्टाळू दुर्गाबाई व भजनी लक्ष्मणराव यांच्या पोटी झाला. लहानपणीच विठ्ठलाचा गणित हा आवडता विषय होता. माथेरानच्या प्राथमिक शाळेत त्यांचे शिक्षण झाले. हुशार मनमिळाऊ स्वभाव व खेळाची आवड असल्यामुळे विठ्ठल आपल्या वर्गात 'प्यारा' असे. त्याची संघटन शक्ती व कुशाग्रबुद्धी वाखाणण्यासारखी होती. लहानपणापासूनच नेत्याचे गुण त्यांच्या अंगी दिसून आले होते.

ते गरीब व न्हावी कुटुंबातील होते. स्थानिक शाळेत शिकत असताना इयत्ता चौथी पर्यंत ते माथेरान येथेच राहिले. स्थानिक शाळेत प्राथमिक शिक्षण घेतल्यानंतर ते पुण्याला त्यांच्या आत्याकडे (गौरु ताई) यांच्याकडे शिक्षणासाठी गेले. व्हर्नाक्युलर मॅट्रीक परीक्षेत ते सपूर्ण पुणे जिल्ह्यांत पहिले आले होते. नंतर त्यांनी वाडिया महाविद्यालयातून पदवीचे शिक्षण घेतले.

तसेच त्यांनी मुंबई येथे कायद्याचे शिक्षण घेतले.शालेय व महाविद्याल यीन शिक्षण घेत असतांना त्यांनी चरित्र ग्रंथ वाचून क्रांतिकारकांच्या यशोगाथा लिहिल्या. गॅरिबाल्डी, मॅझीनी, डीव्हॅलेरा यांची चरित्रे मिळविली. भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांच्या प्रतिमा त्यांच्या डोळ्यासमोर तरळत. त्यांच्या अंगी समाज सेवा व देशसेवा भिनली होती. म्हणून तहसीलदार कचेरीतील 'अण्णासाहेब' ही नगदी कारकुनाची नोकरी सोडून दिली.

पुरुष प्रधान संस्कृतीला व हुंडा देण्या-घेण्याच्या प्रथेला त्यांनी विरोध केला. वेठबिगारी पद्धत नाहीशी करण्याचा प्रयत्न केला.

सामाजिक कार्य चालू असतांना अण्णासाहेब यांनी एल. एल. बी. परीक्षेत १९४१ साली घवघवीत यश मिळविले. शेती, शिक्षण, राजकीय संघटना, हरीजन, गिरीजन, सावकारशाही सरंजामशाही नागरी स्वातंत्र्य अशा विविध विषयांवर त्यांनी प्रगल्भ विचार मांडले. शोषणरहित समाजाची स्थापना करणे; हे त्यांचे उद्दिष्ट होते.१९४२ साली महात्मा गांधींच्या आंदोलनात गांधीजींनी 'करा अथवा मरा' या स्वातंत्र्याच्या शेवटच्या लढ्याच्या आवाहनाने ते भारावून गेले.

भाईंनी शस्त्रे बंदुका जमविल्या व आदिवासी समाजाला शस्त्रांचे शिक्षण दिले. ठाणे व रायगड जिल्ह्यात प्रतिसरकार स्थापन केले.

इंग्रज सरकारला एका फितूर आदिवासीच्या मदतीने भूमिगत भाई कोतवालांचा सुगावा लागला. भाई कोतवालांनी सिद्धगडावर आश्रय घेतला होता. ३१ डिसेंबर १९४२ रोजी सशस्त्र दलाने जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली कोतवाल राहत असलेल्या दुर्गम किल्ल्याला वेढा दिला.

पोलीस दल आणि कोतवालांचे क्रांतिकारक दल यांच्यात समोरासमोर लढाई झाली. पोलिसांची संख्या जास्त होती त्यांच्याकडे सुरक्षित आणि अत्याधुनिक शस्त्रे होती. बंदूका होत्या. तसेच युद्ध कलेसाठी विपुल असे पोलीस दलही होते. दुर्दैवाने भाई कोतवाल यांच्या संघटनेकडे भाले, तलवारी आणि जुन्या पद्धतीच्या बंदुका होत्या आदिवासी आणि कातकरी हा समाज शस्त्रे चालवण्यामध्ये निपुण नव्हता. तरीही भाई प्राणपणाने लढले. ब्रिटिश अधिकारी हॉल याने अण्णांच्या डोक्यात गोळी झाडली. आणि एका क्रांतिकारकाचा खून केला. भाईंची प्राणज्योत मालवली. अशाप्रकारे भाई कोतवाल यांना २ जानेवारी १९४३ रोजी इतर २ क्रांतिकारकांसह हौतात्म्य प्राप्त झाले.

## कल्याण पश्चिम आणि उल्हासनगरमधील विजयाबद्दल देवेंद्र फडणवीसांकडून नरेंद्र पवार यांचे कौतुक



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**
दि.०१: नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत राज्यभरात महायुतीला घवघवीत असे यश मिळाले आहे. कल्याण पश्चिमेतील भाजपचे नेते आणि माजी आमदार नरेंद्र पवार यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत त्यांचे अभिनंदन केले.

तर यावेळी कल्याण पश्चिम आणि उल्हासनगर विधानसभा मतदारसंघात महायुतीच्या उमेदवारांच्या विजयाबद्दल फडणवीसांकडून नरेंद्र पवार यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यात आली.

अवघ्या आठवडाभरापूर्वी राज्याच्या विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाला असून त्यामध्ये शिवसेना भाजप राष्ट्रवादी रिपाइं आणि मित्रपक्षांच्या महायुतीला रेकॉर्ड ब्रेक बहुमत मिळाले आहे. राज्यातील जनतेने शिवसेना, भाजप राष्ट्रवादीच्या उमेदवारांना अत्यंत भरघोस मतांनी विजयी करत महाविकास आघाडीला अक्षरशः चारही मुंड्या चित केले आहे. त्यातही देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वा खाली भारतीय जनता पक्षाने आतापर्यंतच्या विधानसभा निवडणुकीत 'न भूतो..' अशी ऐतिहासिक कामगिरी केली आहे. भाजपाचे तब्बल १३२ आमदार यंदा बहुमताने निवडून आले आहेत.

भाजपासह महायुतीच्या या महाविजयामध्ये भाजपचे फायरब्रँड नेते देवेंद्र फडणवीस यांचा सिंहाचा वाटा आहे आहे. भाजपला ही सुवर्ण कामगिरी करून दिल्याबद्दल कल्याण पश्चिमेतील भाजप नेते आणि माजी आमदार नरेंद्र पवार यांनी देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत त्यांचे अभिनंदन केले. तसेच या विजयाने राज्यभरातील भाजप नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास प्रचंड वाढला असून आगामी महापालिका निवडणुकीतही हीच पुनरावृत्ती करण्यासाठी तो सज्ज असल्याचे नरेंद्र पवार यांनी यावेळी फडणवीस यांना सांगितले.

तर भाजप पक्षश्रेष्ठींकडून माजी आमदार नरेंद्र पवार यांच्या खांद्यावर कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघासह उल्हासनगर विधानसभेचे प्रभारीपद देण्यात आले होते. या दोन्ही ठिकाणी महायुतीचे उमेदवार विश्वनाथ भोईर आणि कुमार आयलानी यांना घवघवीत यश मिळाले आहे. या यशाबद्दल देवेंद्र फडणवीस यांनी माजी आमदार नरेंद्र पवार यांचे विशेष कौतुक करत पाठीवर शाबासकीची थापही दिली.

# "Green Grow Agro Solutions" चा उद्धाटन सोहळा दिमाखात संपन्न

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :**
दि.०१: मुरबाड तालुक्यातील म्हसा येथे दि.२७ नोव्हेंबर २०२४ रोजी 'Green Grow Agro Solutions' चा उद्‌घाटन सोहळा दिमाखात संपन्न झाला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मंत्रालय बँकेचे उपाध्यक्ष श्री.सुनील खाडे उपस्थित होते. त्यांच्या हस्ते फीत कापून व दीपप्रज्वलन करून दुकानाचे उद्‌घाटन करण्यात आले.




या कार्यक्रमास म्हसा ग्रामपंचायतीचे सरपंच प्रविण घागस, कान्होळ ग्रामपंचायतीच्या सरपंच श्रीमती पूनम जिवान शेळके, चिरड येथील श्री.जयवंत तुळशीराम कंटे, बोरिवळी येथील श्री.काळूराम दत्तु घरत तसेच नागरिक आणि ग्राहकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

'Green Grow Agro Solutions' मध्ये ग्राहकांसाठी सॉइल चार्जर टेक्नोलॉजी वैदिकची उत्कृष्ट दर्जाची शेतीसाठी लागणारी खते व औषधे उपलब्ध आहेत.

दुकानाचे मालक श्री.तुषार चंद्रकांत चौधरी यांनी या यशस्वी सोहळ्यासाठी सर्व उपस्थितांचे आभार मानले आणि भविष्यातही दर्जेदार सेवा देण्याचा निर्धार व्यक्त केला. तसेच 'Green Grow Agro Solutions' ला दुकान क्र.३, अंकिता कॉम्प्लेक्स, म्हसा-मुरबाड रोड, म्हसा, तालुका - मुरबाड, जिल्हा - ठाणे येथे सकाळी ९ ते ५ या वेळेत भेट द्यावी, असे आवाहनही श्री.चौधरी यांनी केले.

## भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे प्लॅस्टिक निर्मूलन पथकाची धडक कारवाई

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ भिवंडी(प्रतिनिधी) :**
दि.०१: महाराष्ट्र शासन यांचे मार्फत आगामी काळात सर्व सण व उत्सव पर्यावरणपुरकक साजरे करणेबाबत मार्गदर्शक सुचना प्राप्त झाले असुन त्याअनुषंगाने भिवंडी शहरातील एकल वापर प्लॅस्टिक बंदी मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करीता प्लॅस्टिक निर्मुलन पथक तयार करणेत आलेला आहे.

मा. प्रशासक तथा आयुक्त सो. आणि मा. उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कल्याण यांचे निर्देशानुसार महानगरपालिकेचे प्लॅस्टिक निर्मुलन पथक, आणि प्लॅस्टिक निर्मुलन पथक कर्मचारी यांनी संयुक्तपणे दिनांक २७/११/२०२४ रोजी मे. टिप टॉप स्विट अँड फरसाण मार्ट, कल्याणनाका, भिवंडी आणि मे. रिषभ पोलिस्टर एल.एल.पी. भिवंडी टॉकीज, भाजी मार्केट, भिवंडी या ठिकाणी धाड टाकली असता जनरल आयटम्स्, प्लास्टिक पिशवी (अविघटनशील एकल वापर प्लॅस्टिक) साठा अंदाजे १००० किलो माल जप्त करण्यात आलेला आहे. जप्त केलेला माल मनपाच्या आरोग्य भांडारगृहात जमा करण्यात आलेला आहे. संबंधित दुकानदार यांना अविघटनशील प्लॅस्टिक साठवणुक करीता रक्कम रु. १०,०००/- दंड आकारण्यात आला आहे.आगामी काळात महिला बचत गट यांचेमार्फत आवश्यक कापडी, कागदी पिशवी तयार करणेकामी उपक्रम राबवुन नागरिकांना व व्यापारी दुकानदारांना व्यापक प्रमाणात जनजागृती करणेत येईल. तसेच भिवंडी शहरातील सर्व व्यापारी, विक्रेते आणि नागरिकांना आव्हान करणेत येते की, पर्यावरण संवर्धन व संरक्षणाकरीता भविष्यकाळात कापडी व कागदी पिशवी वापरणे बंधनकारक आहे.

# डोंबिवलीतील फडके रोडवरील अनधिकृत फेरीवाल्यांवर पालिकेची कारवाई

## दुकानदार आणि नागरिकांनी मानले आभार

## नो पार्किंग मधील दुचाकीवर वाहतूक पोलिसांची कारवाई

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ डोंबिवली(प्रतिनिधी) :**
दि.०१:पूर्वेकडील प्रसिद्ध असलेल्या फडके रोडवर अनधिकृत फेरीवाले आणि अनधिकृत दुचाकी पार्किंगमुळे नागरिकांना त्रास होत होता. कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या 'फ' प्रभाग क्षेत्र सहायक आयुक्त हेमा मुंबरकर,फेरीवाला अतिक्रमण विभाग कर्मचारी व पोलीस यांनी अनधिकृत फेरीवाल्यांवर कडक कारवाई करण्यात आली. तर डोंबिवली वाहतूक नियंत्रण कक्षाचे पोलीस निरीक्षक श्रीराम पाटील व कर्मचारी यांनी फडके रोडवरील नो पार्किंग मध्ये पार्क केलेल्या दुचाकिंवर कारवाई केली.पालिकेची कारवाई सुरु असताना फेरीवाल्यांची पळापळ सुरु झाली होती. तर महिलावर्गाने पालिकेची कारवाई पाहून कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या 'ग' प्रभाग क्षेत्र सहायक आयुक्त हेमा मुंबरकर यांचे आभार मानले.



कारवाई बाबत म्हणाल्या, पालिकेची कारवाईत सातत्य आहे. डोंबिवली स्टेशनं बाहेरील परिसर फेरीवाला मुक्त करण्यासाठी कारवाई सुरूच राहील. तंत्र नोंदणीकृत फेरीवाल्यांना अद्याप हक्काची जागा देण्यास पालिका प्रशासनाकडून विलंब होत असल्याबाबत पत्रकारांनी विचारले त्या म्हणाल्या, पालिका प्रशासना त्याबाबत विचारधीन असून नोंदणीकृत फेरीवाल्यांना नक्कीच जागा मिळेल.

# व्होरा एक्सपोर्टर्स आणि धनलक्ष्मी फॅब्रिक्समध्ये वाद

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी) :**
दि.०१: धनलक्ष्मी फॅब्रिक्स लिमिटेड, वस्त्रोद्योगातील आघाडीचे नेते आणि व्होरा एक्स्पोर्ट्स यांच्यात मोठा व्यापार विवाद उघडकीस आला आहे. हा वाद थकीत रक्कम आणि कच्च्या मालाच्या पुरवठ्यातील अडथळयाबाबत आहे. त्याचवेळी या प्रकरणात मध्यस्थी करणाऱ्या हिंदुस्थान चेंबर्स ऑफ कॉमर्सने चौकशी न करता वेतन आदेश दिल्याने प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, मेसर्स धनलक्ष्मी फॅब्रिक्स लिमिटेड (डीएफएल) ही कापड प्रक्रिया करणारी कंपनी आहे. ज्यासाठी व्होरा एक्सपोर्ट कच्चा माल आणते आणि प्रक्रियेसाठी देते. दरम्यान, करार आणि अटींचे उल्लंघन करून डीएफएलने ३१ मार्च २०२३ रोजी पूर्वसूचना न देता कारखाना बंद केला. त्यामुळे व्होरा निर्यातीला मोठे नुकसान सहन करावे लागले. एवढेच नाही तर डीएफएल कंपनी कच्चा माल परत करण्यास तयार नाही आणि आता डीएफएल २०१५ पासूनची थकबाकी दाखवून अधिक रकमेची मागणी करत आहे.


व्होरा एक्सपोर्ट्सकडे पेमेंट रेकॉर्ड आणि सर्व कागदपत्रे आहेत. हिंदुस्थान चेंबर ऑफ कॉमर्सच्या मध्यस्थीने त्यांनी सर्व खाती साफ केली होती. आणि थकीत रकमेची पे ऑर्डर करून हिंदुस्थान चेंबर ऑफ कॉमर्सला दिली. आणि त्यानंतरच ही पे ऑर्डर डीएफएलकडे सोपवली जाईल, अशी अट ठेवण्यात आली होती. जेव्हा सर्व कच्चा माल लोड केला जातो आणि वितरणासाठी तयार असतो मात्र असे काही होण्यापूर्वीच हिंदुस्थान चेंबर ऑफ कॉमर्सने डीएफएलला पे ऑर्डर दिली.


व्होरा एक्स्पोर्टचे मालक साथी व्होरा यांनी ही बाब गंभीर असल्याचे सांगून न्यायाची मागणी केली आहे. सहा महिन्यांनंतरही डीएफएलला दिलेल्या मालावर प्रक्रिया करून परत करण्यात आलेले नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. हिंदुस्थान चेंबर्स ऑफ कॉमर्ससारख्या नामांकित कंपनीने कोणतीही चौकशी न करता हा आदेश कसा दिला, यामागे त्यांचा हेतू काय होता, हे त्यांना समजू शकलेले नाही, हे आश्चर्यकारक आहे.

# बी. एन. एन. महाविद्यालयात एस. चंद्रशेखर तारांगणाचे कामनकर दुर्राज यांच्या हस्ते उद्घाटन

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ भिवंडी(प्रतिनिधी) :**
दि.०१: पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळाचे बी. एन. एन. महाविद्यालयात आज एस. चंद्रशेखर तारांगणाचे उद्‌घाटन के के अँड असोसिएटचे कामनकर दुर्राज शमीम यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी संस्थाध्यक्ष डॉ. विजय जाधव. कार्याध्यक्ष बाळकृष्ण काळे, सरचिटणीस आर एन पिंजारी, के के अँड असोसिएटचे झियादभाइ मोमिन, विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या महेक पठाण, उपप्राचार्य डॉ.सुधिर निकम, डॉ. सुरेश भदरगे, डॉ. निनाद जाधव, प्रबंधक नरेश सिरसाळे, जेष्ठ पत्रकार जगदीशकुमार पाठारे, डी. एल. अहिरे, अशोक हिवरे, जी. आर पाटील आदिंची उपस्थिती होती.



या तारांगणामध्ये बसून आपल्याला अवकाशाचे लाइव्ह दर्शन करता येणार आहे. यामध्ये चंद्र-सुर्य, तारे व ग्रहांची लाईव्ह हालचाल पाहता येणार आहे. या तारांगणात गेल्यावर अवकाशात सफर केल्यासारखा भास होतो.

या प्रकल्पाचा लाभ शालेय व संशोधक विद्यार्थ्यांना खगोलशास्त्राचे अभ्यास करण्यासाठी होणार आहे.

मुंबई विद्यापीठांतर्गत बी. एन. एन. महाविद्यालयाने अशा प्रकारचा हा पहिला प्रकल्प उभारला आहे. हा प्रकल्प यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. अशोक वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. दिलीप

## तारांगणामध्ये बसून करता येणार अवकाशचे लाईव्ह दर्शन

काकविपुरे, डॉ. रवी मनोहर यांच्यासह आजी माजी विद्यार्थ्यांनी परीश्रम घेतले.हा प्रकल्प सर्वांना पाहण्यासाठी उद्यापासून खुले करण्यात येणार आहे. अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या प्रकल्पाला भेट द्यावेत असे आवाहन महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

# बहुजनांचा बुलंद आवाज अनंतात विलीन..

## ॲड.सुमिता सुरेशदादा पाटील (मोठी वहिनी) यांचे निधन




७ ऑक्टोबर १९५२ रोजी ठाणे जिल्ह्यातील शहापूर या गावात गंगा रोड येथे दमाणे परिवारत सुमिता वहिनींचा जन्म झाला.

शहापूरच्या दमाणे परिवाराची सुकन्या विमल गोविंद दमाणे १९७३ साली कोन गावच्या पाटील परिवाराची सून झाली आणि तेथूनच त्यांचा एक नवीन जीवन प्रवास सुरू झाला खरंतर हा जीवन प्रवास इतरांना थक्क करणारा तसेच मार्गदर्शक ठरणारा आहे.

आज पासून बरोबर ५१ वर्षांपूर्वी गजानन अण्णा पाटील यांच्या परिवारात सुमिताताई सून म्हणून आल्या आणि इथेच त्यांना सासु सासऱ्याच्या रूपात त्यांचे दुसरे आई-वडील म्हणजेच गजानन अण्णा आणि वत्सला आई भेटली. खरंतर एका सुशिक्षित कुटुंबातून दुसऱ्या सुशिक्षित कुटुंबातला त्यांचा हा प्रवास होता कारण माहेरी त्यांचे वडील गोविंद दमाने आरोग्य खात्यात सेवा करत होते शहापूर तालुक्यातील एक प्रतिष्ठित व्यक्ती म्हणून त्यांचा पंचक्रोशीत परिचय होता. त्यामुळे माहेरपासूनच सुमिता वहिनींना शिक्षण आणि संस्कार यांचं बाळकडू मिळालं होतं. मुळातच ज्या कुटुंबात वहिनींचा जन्म झाला त्या कुटुंबाला शिक्षणाची आवड होती आणि म्हणूनच तेथूनच शिक्षणाला सुरुवात झाली आणि याच शिक्षणाच्या जोरावर सन १९७० मध्ये आमच्या वहिनी सेंट्रल एक्साईज मध्ये सर्विसला लागल्या. संबंध पंचक्रोशीत एवढी उंच भरारी घेणारी पहिली तरुणी म्हणून वहिनी ओळखल्या जाऊ लागल्या. सुरेश दादांशी झालेल्या विवाह नंतर ज्या कुटुंबात वहिनींचा प्रवेश झाला ते कुटुंब म्हणजे गजानन अण्णांचे आणि वत्सला आईचे कुटुंब होते ज्या कुटुंबाला अगोदरपासूनच सांस्कृतिक, शैक्षणिक आणि सामाजिक असा फार मोठा वसा आणि वारसा लाभलेला होता. आपल्या सासू-सासऱ्यांना आई-वडिलांप्रमाणे मानणाऱ्या सुमिता वहिनींनी त्या कुटुंबाचा हाच सांस्कृतिक, शैक्षणिक आणि सामाजिक वसा आणि वारसा पुढे देखील तसाच सुरू ठेवला.

सर्व जबाबदारी सुरळीतपणे पार पाडीत असतानाच पती श्री.सुरेशदादा पाटील यांच्या सोबत शाहू-फुले-आंबेडकरी चळवळीत त्या सक्रिय झाल्या व तेथूनच कॅडर कॅम्प, परिसंवाद, सभा, अधिवेशने यात वाहिनी सहभागी झाल्या. बहुजनांच्या हक्कासाठी देश पातळीवर काम करीत असलेल्या बामसेफ व राष्ट्रीय मूलनिवासी संघाच्या कार्यासाठी त्यांनी आपले जीवन वाहून घेतले.

कौटुंबिक जबाबदारी तसेच नोकरी करीत असतानाच आई आण्णाचे प्रोत्साहन व शिक्षणाचे महत्व जाणून त्यांनी पदव्युत्तर शिक्षण पुर्ण केले. प्रबळ इच्छाशक्ती जिद्द चिकाटी व कष्ट करण्याची तयारी या जोरावर त्यांनी L.L.B पदवीसह भारत सरकारच्या सेंट्रल एक्साईज डिपार्टमेंटच्या अनेक परीक्षा उत्तीर्ण होऊन त्या भारत सरकारच्या क्लास वन ऑफिसर झाल्या. स्वकर्तृत्वाने त्या प्रशासनाच्या अतिउच्च शिखरावर विराजमान झाल्या.

त्याचबरोबर त्यांच्या सामाजिक कार्याची कक्षा सुद्धा दिवसेंदिवस वाढतच जात होती. राष्ट्रीय पातळीवर व्यवस्थेविरुद्ध आवाज उठवून अन्यायाला वाचा फोडण्यासाठी चळवळीमध्ये सक्रीय भाग घेऊन जातीनिहाय जनगणना, ईव्हीएमला विरोध, ओबीसी आरक्षण, SC, ST, OBC चे आणि विद्यार्थ्यांचे प्रश्न, आदिवासींचे प्रश्न अशा अनेक आंदोलनात त्या सक्रिय सहभागी झाल्या त्यातून त्यांना अनेक वेळा अटक देखील झाली परंतु त्या डगमगल्या नाहीत जिद्दीने आणि जोमाने त्यांनी त्यांचे कार्य सुरूच ठेवले.

त्यांच्या या कार्याचे फळ म्हणूनच की काय त्यांना देश पातळीवरील भारत मुक्ती पार्टीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष म्हणून देखील निवडले गेले. त्यातूनच त्यांचा देशातील राजकीय नेत्यांशी चांगला संपर्क आला. त्यांच्या कार्याची दखल घेऊन लोकनेते दि.बा.पाटील व दत्ता पाटील यांनी त्या काळात सुमिता वहिनींच्या कार्याचा गौरव केला.

ही आम्हा आगरी आणि ओबीसी समाजातील सर्व बांधवांसाठी गर्वाची बाब म्हणावी लागेल.

सुमिता पाटील या अभ्यासपूर्ण प्रभावी वक्त्या होत्या त्यांनी ३००० हून अधिक सामाजिक विषयांची पुस्तके त्यांच्या संग्रही जपून ठेवली आहेत. ओबीसी बहुजन समाज हा सामाजिक दृष्ट्या मागासलेला आहे तो जागृत व्हावा तो शिव, शाहू-फुले आंबेडकरी विचारांवर चालणारा व्हावा यासाठी वहिनींनी त्यांचे संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात त्यासाठी त्यांनी आंदोलने केली . प्रशिक्षण वर्ग चालविले शाहू-फुले-आंबेडकरी विचारांचे हजारो अनुयायी त्यांनी तयार केले.

हे सर्व करीत असताना एखाद्या राजकीय पुढाऱ्याप्रमाणे प्रचंड जनसंपर्क असलेल्या आमच्या सुमिता वहिनींनी त्यांच्या सामाजिक कार्यासाठी देशभर प्रचंड प्रवास केला व महिलांचे एक फार मोठे संघटन उभे केले.

इतर समाजाबरोबरच बहुजन समाजातील कोणतीच महिला ही शिक्षणापासून वंचित राहू नये या सासू-सासऱ्यांच्या विचाराने प्रेरित होऊन सुमिता वहिनींनी अनेक शैक्षणीक संस्था उभारणीमध्ये सक्रीय सहभाग घेतला. आपल्या ग्रामीण भागामध्ये सुद्धा उच्च महाविद्यालय असावे ही इच्छा आपल्या परिवारासमोर मांडली आणि परिवाराने देखील त्याला साद घातली आणि सर्वांच्याच विचारातून 'गजाननराव पांडुरंग पाटील महाविद्यालय' कोन गावामध्ये उभे राहिले. आमच्या वहिनी या महाविद्यालयाच्या कार्यक्षम संचालक ठरल्या, महाविद्यालयाच्या अनेक कार्यक्रमांमध्ये वहिनी मोठ्या उत्साहाने सहभागी होत होत्या. याबरोबरच विभागातील महिलांना संगठित करून सक्रीय अशा जागृती महिला मंडळाच्या देखील अध्यक्ष होत्या. असं हे सर्वांना आदर्शवत ठरणार नेतृत्व दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी म्हणजे संविधान दिनाच्या दिवशीच अल्पशा आजारामुळे आपल्यातून निघून गेल्या.वयाच्या ७२ व्या वर्षी वहिनींची प्राणज्योत मावळली.त्यांच्या विचारांचा एक अनुयायी म्हणून मी माझ्या ठाणगे पाटील परिवाराच्या वतीने तसेच गजाननराव पांडुरंग पाटील महाविद्यालय परिवाराच्या वतीने वहिनींना भावपूर्ण आदरांजली वाहतो...!!!

ईश्वर त्यांच्या पवित्र आत्म्यास चिरशांती देवो !!

**प्रा.विक्रांत ठाणगे**
**प्राचार्य, गजाननराव पांडुरंग पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,कोन भिवंडी.**




## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एका शिवसैनिकाला आमदार बनवल याचा शिवसैनिकांना आनंद

### आमदार राजेश मोरेंचा डोंबिवलीत सत्कार



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ डोंबिवली(प्रतिनिधी) :** शिवसेना साऊथ इंडियन सेल व श्री मूकाबिका सोशल वेलफेअर फाउंडेशनच्या वतीने कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे आमदार राजेश मोरे यांचा डोंबिवलीतील शिवसेना मध्यवर्ती शाखेत जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी शिवसेना साऊथ इंडियन सेल ठाणे जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष शेट्टी, ठाणे जिल्हा महिला अध्यक्षा अनुपमा शेट्टी, साऊथ सेल शहर संघटक प्रकाश शेट्टी, विभाग संघटक बाळकृष्ण पुजारी, विभाग संघटक प्रेमा सुवर्णा,मल्लिका शेट्टी, आशा शेट्टी,रेखा शेट्टी,उषा शेट्टी,विजया शेट्टी,उपविभाग संघटक जयंती शेट्टी, अरुणा शेट्टी, ज्योती शेट्टी यासह अनेक पदाधिकारी व शिवसैनिकांनी शाल आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी शिवसेना साऊथ इंडियन सेल ठाणे जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष शेट्टी म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एका शिव सैनिकाला आमदार बनवल याचा सर्वांना आनंद होत आहे.तर ठाणे जिल्हा महिला अध्यक्षा अनुपमा शेट्टी म्हणाल्या,आम्हाला खूप आनंद होत आहे की राजेश मोरे हे आमदार झाले. एकनाथ शिंदे हे पुन्हा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री व्हावे ही शिवसैनिकांची मनापासून इच्छा आहे.

## नागरिकांनी राज्यघटनेने दिलेले कर्तव्य पार पाडावे

**– मंदार जवळे, सहाय्यक पोलीस आयुक्त**

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ ठाणे(प्रतिनिधी) :** परिसर गुन्हेगारी मुक्त कसा राहील यासाठी पोलीस कायम प्रयत्न करत असतात. त्यासाठी समाजातील अनेक घटक सिव्हील ड्रेस मध्ये पोलिसांचे खांद्याला खांद्या लावून काम करतात. अनेक गोष्टी आमच्यापेक्षा तुम्हाला माहित असतात अशा गोष्टीची आम्हाला माहिती पडाव्यात म्हणून जागरूक नागरिक म्हणून तुम्ही तुमचे नागरी कर्तव्य पार पाडावे. समाजातील विविध सण उत्सवामध्ये आपण सर्वजण सोबत काम करतो.



पोलीस मित्र म्हणून आपण ही जबाबदारी पार पडतात. आपले आसपास काय घडते यावर लक्ष असावे. आपण आमचे सोबत असल्यामुळे आम्हाला प्रत्येक विभागातील माहिती मिळते. पोलिसाकडे असलेले मनुष्यबळ अपुरे आहे. आपले मदतीने आम्ही सोसायटीसाठी चांगले काम करू शकतो. तुमच्या परिसरातील चांगल्या व वाईट गोष्टी आपले मार्फत आमच्यापर्यंत पोहोचाव्यात. तुम्ही आमचा तिसरा डोळा आहात. त्यामुळे आम्हाला चांगले काम करता येईल. आपले चांगल्या कामाचे आमच्याकडून सन्मानपत्र देऊन कौतुक केले जाईल. त्यामुळे आपण राज्यघटनेने दिलेले आपले कर्तव्य पार पाडावे असे प्रतिपादन सहाय्यक पोलीस आयुक्त मंदार जवळे यांनी पोलीस मित्र संघटनेच्या सभेमध्ये बोलताना केले.

दिनांक २९ नोव्हेंबर २०२४ रोजी पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांचे मार्गदर्शनाखाली व सहायक पोलीस आयुक्त मंदार जवळे यांच्या अध्यक्षते खाली कापुरबावडी पोलीस ठाणे येथे ४ पोलीस स्टेशन अंतर्गत असलेल्या पोलीस मित्र संघटनेच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महिला पोलीस निरीक्षक वैशाली गोर्डे,गणेश संपत तांबे, विश्वनाथ भिवलकर, श्याम पडवळ, संभाजी पंडित, विद्या शिंदे, भारती भोसले, उषा केंजळे, सुषमा ठाकूर, अर्चना गांगुर्डे, आणि अन्य विभागातील पोलीस मित्र उपस्थित होते.

यावेळी पोलीस मित्र संघटनेचे ठाणे जिल्हा अध्यक्ष गणेश संपत तांबे आणि सहकारी यांनी समाजातील भेडसावणाऱ्या गुन्हेगारी बद्दल असणाऱ्या समस्या बाबत मनोगत मांडुन सुचना सुचवल्या. या सूचना व समस्यांचे सहायक पोलीस आयुक्त मंदार जवळे यांनी निरसण केले.

पान १ वरून...

### भाज्या महागल्या...

सध्या राज्यात सर्वत्र थंडीची लाट पसरली आहे. हे वातावरण काही भाज्यांच्या वाढीसाठी पूरक नसल्यामुळे या भाज्यांची वाढ होण्यास विलंब होत आहे. त्यामुळे भाज्यांचे उत्पादन घटल्याची माहिती नवी मुंबईचे घाऊक भाजीपाला व्यापारी महासंघाचे अध्यक्ष बाळासाहेब बडदे यांनी दिली.

भारतात लसणाचे पीक झाले नसून इजिप्त आणि अफगाणिस्तान या देशांतून लसणाची आयात केली जात आहे. मागील वर्षीच्या तुलनेत यंदा लसणाची साठवण कमी आहे. मागील वर्षी १० ते २० प्रतिकिलो रुपयांनी बाजार भावाने लसूण विक्री केला जात होता. त्यामुळे यंदा अनेक शेतकऱ्यांनी लसणाचे पीक घेतले नसल्याने भारतात लसणाची आवक घटली आहे. वाशी कृषी उत्पन्न बाजार समितीत दररोज अडीच ते तीन हजार नग लसूण येत आहे. घाऊकात २०० ते ३०० प्रति किलो रुपयांनी लसूण विकला जात आहे. १५ जानेवारीनंतर मध्य प्रदेश येथून लसूण आयात होईल. त्यानंतर लसणाचे दर कमी होतील, अशी माहिती वाशी कृषी उत्पन्न बाजार समितीतील कांदा - बटाटा बाजार विभागातील साहाय्यक सचिव बाळासाहेब टावरे यांनी दिली.

सध्या मोठ्या प्रमाणात शेतमाल हा स्थानिक बाजारात विक्री केला जात आहे. त्यामुळे बाजार समितीत भाज्यांची आवक घटल्याची माहिती वाशी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या भाजी बाजारचे उपसचिव मारुती पबितवार यांनी दिली.

### मतांच्या पुनर्मोजणीसाठी...

ईव्हीएम विरोधात रोष व्यक्त केला आहे. त्यामुळे लोकांच्या मागणीचा विचार करून डोंबिवली शहराच्या विविध भागात ठाकरे गटाकडून स्वाक्षरी मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या स्वाक्षरी मोहिमेच्या माध्यमातून ईव्हीएम यंत्राऐवजी कागदी मतपत्रिकेच्या माध्यमातून निवडणुका घेण्यात याव्यात, अशी मागणी निवडणूक आयोगाकडे केली जाणार आहे, असे माजी नगरसेवक दीपेश म्हात्रे यांनी सांगितले. डोंबिवली विधानसभा निवडणुकीत प्रत्यक्ष झालेले मतदान आणि मतदानाच्या दिवशी बाहेर आलेले आकडे पाहता, त्यात तफावत दिसून आली आहे. त्यामुळे आपण १० व्हीव्हीपॅट यंत्रांमधील मते पुनर्मोजणीची मागणी केली आहे. त्यासाठी लागणारे शुल्क जिल्हाधिकारी कार्यालयाकडे भरणा केले आहे, असे म्हात्रे यांनी स्पष्ट केले.

पान १ वरून...

### मुख्यमंत्री लाडकी बहीण...

डोंगरामुळे काही निवडक महिलांना या योजनेचा लाभ मिळवता येईल, असं आशंका व्यक्त केली जात होती. पण अजित पवार यांच्या वक्तव्यानंतर या संप्रदायांवर अंत केली आहे आणि योजनेतील महिलांना आता अधिक आत्मविश्वास मिळाला आहे. दरम्यान, योजनेअंतर्गत आतापर्यंत ५ हप्ते दिले गेले आहेत. जुलै ते नोव्हेंबर महिन्याचे ७,५०० रुपये महिलांना मिळाले होते. डिसेंबर महिन्याचे पैसे आचार संहितेच्या कारणाने थांबवण्यात आले होते, परंतु आता निवडणुकीनंतर पैसे दिले जातील. आगामी ६ व्या हप्त्याच्या रूपात महिलांना १,५०० की २,१०० रुपये मिळतील याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

### ठाण्यातील हवेची गुणवत्ता...

नागरिक, शाळकरी मुले किंवा चालण्यासाठी बाहेर पडणाऱ्या नागरिकांना त्याचा त्रास अधिक जाणवू शकतो.

तर केंद्रीय प्रदूषण नियंत्रण विभागाच्या निर्देशांकानुसार ठाणे जिल्ह्याची हवेची गुणवत्ता मध्यम पातळीवर नोंदविण्यात आली. जिल्ह्यातील ठाणे शहरात सरासरी १४०, नवी मुंबई येथे १४०, बदलापूर येथे १६० हून अधिक निर्देशांक नोंदविण्यात आला. सरकारी निर्देशांकानुसार १०१ ते २०० ही पातळी मध्यम म्हणून नोंदविली जाते. असे असले तरी या निर्देशांकामुळे हृदयरोग, श्वसनाचा त्रास, फुफ्फुसासंदर्भातील आजार असलेल्या नागरिकांना श्वास घेण्यासाठी त्रास होऊ शकतो असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

एक्यूआय डॉट कॉम या संकेतस्थळाच्या निर्देशांकानुसार, ० ते ५० चांगली, ५१ ते १०० समाधानकारक, १०१ ते २०० वाईट आणि २०१ ते ३०० आरोग्यास धोकादायक, ३०१ ते ४०० गंभीर आणि ४०१ ते ५०० घातक अशा पातळीवर गणली जाते. तर केंद्रीय प्रदूषण नियंत्रण विभागाच्या संकेतस्थळानुसार, ० ते ५० चांगली, ५१ ते १०० समाधानकारक, १०१ ते २०० मध्यम, २०१ ते ३०० वाईट, ३०१ ते ४०० अतिशय वाईट आणि ४०१ पेक्षापुढे गंभीर या गुणवत्तेनुसार गणली जाते.

नियमित वाचा
दैं. ठाणे जीवनदीप वार्ता

## मुस्लीमबहुल मतदारसंघांत महायुतीच्या 'व्होट जिहाद'च्या आरोपानंतरही २१ जागा



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ मुंबई(प्रतिनिधी) :** लोकसभा निकालानंतर 'व्होट जिहाद'चा आरोप उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला असला तरी नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत मुस्लीमबहुल ३८ मतदारसंघांपैकी सर्वाधिक २१ मतदारसंघांमध्ये महायुतीला यश मिळाले आहे. विशेष म्हणजे त्यातील १४ जागा भाजपने जिंकल्या आहेत.

राज्यातील ३८ विधानसभा मतदारसंघांमध्ये २० टक्क्यांपेक्षा अधिक मुस्लीम मतदार आहेत. यापैकी २१ मतदारसंघांत महायुतीला यश मिळाले. मुस्लीमबहुल मतदारसंघात भाजप १४, शिवसेना (एकनाथ शिंदे) ५, राष्ट्रवादी (अजित पवार) २ अशा २१ जागा महायुतीने जिंकल्या आहेत. काँग्रेस ५, शिवसेना (उद्धव ठाकरे) ६, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) ३ अशा १४ जागा महाविकास आघाडीला मिळाल्या आहेत. समाजवादी पक्षाने दोन आणि 'एमआयएम'ने एक जागा मुस्लीमबहुल मतदारसंघात जिंकली.

सहा महिन्यापूर्वी लोकसभा निवडणुकीत राज्यात भाजपला मोठी हार पत्करावी लागली होती. त्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील मुस्लीम समाजावर 'व्होट जिहाद'चा आरोप केला होता. तसेच या विधानसभा निवडणुकीत हिंदूंनी धर्मयुद्ध पुकारावे, असे आवाहनही केले होते. या आरोपानंतरही मुस्लीमबहुल क्षेत्रात महायुतीने भाजपच्या १४ जागांसह एकूण २१ जागा जिंकल्या आहेत. २०१९ च्या निवडणुकीत भाजपला या क्षेत्रात ११ जागा मिळाल्या होत्या.महायुतीला मतांच्या विभाजनाचा फायदा झाला आहे. मुस्लीमबहुल मतदारसंघांमध्ये एकापेक्षा अनेक मुस्लीम उमेदवार रिंगणात होते, त्याचाही फायदा झाला. त्याचेच उदाहरण म्हणजे अमरावती मतदारसंघात काँग्रेस आणि अपक्ष मुस्लीम उमेदवाराला जवळपास समान मते मिळाली. त्याचा फायदा महायुतीला झाला. अशी अनेक उदाहरणे देता येतील.

राज्यात मुस्लीम समाजाची २०११ च्या जनगणनेनुसार ११.५६ टक्के लोकसंख्या (१ कोटी ३० लाख) आहे. भिवंडी पश्चिम ४९ टक्के, अंधेरी-पश्चिम २७ टक्के, वांद्रे -पश्चिम २६ टक्के, अकोट २७ टक्के, सोलापूर -मध्य २५ टक्के, नागपूर -मध्य मतदारसंघात २३ टक्के मुस्लीम मतदार आहेत. तरीसुद्धा या मतदारसंघात भाजपचे हिंदू उमेदवार विजयी झाले. आश्चर्य म्हणजे मुस्लीमबहुल मतदारसंघात विजयी झालेले भाजपचे उमेदवार २० ते ५० हजाराच्या मोठ्या फरकाने जिंकले आहेत.

भाजपचा मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेने (शिंदे) मुस्लीमबहुल मतदारसंघात ५, तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादीने दोन जागा जिंकल्या. भाजपने एकाही मुस्लीम व्यक्तीला उमेदवारी दिली नव्हती. शिंदे शिवसेनेने १ आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीने ५ मुस्लीम उमेदवार दिले होते, तर महाविकास आघाडीच्या तिन्ही पक्षांनी ११ मुस्लीम उमेदवार दिले होते. निवडणुकीत १० मुस्लीम उमेदवारांचा विजय झाला.

**महायुतीने जिंकलेल्या मुस्लीमबहुल क्षेत्रातील जागा**

- भाजप : भिवंडी- पश्चिम, औरंगाबाद- पश्चिम, अंधेरी-पश्चिम, अकोट, वांद्रे -पश्चिम, सोलापूर -मध्य, धुळे -शहर, नागपूर मध्य, सायन- कोळीवाडा, कारंजा, पुणे कॅन्टोनमेंट, रावेर, वाशिम, मलकापूर.
- शिवसेना (एकनाथ शिंदे) : औरंगाबाद- पूर्व, कुर्ला, चांदीवली, नांदेड -उत्तर, नांदेड -दक्षिण
- राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) : अमरावती, अणुशक्तीनगर

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी